# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१ / २२८४६९७४
Email:- jalseven.wc@gmail.com
narayan.karad@nic.in

क्रमांक :-जशिअ.-२०१७/प्र.क्र.२४७/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १६ मे, २०१७

**प्रति,**
सर्व जिल्हाधिकारी,

**विषय :- यथार्थदर्शी** आराखड्यानूसार **पाणलोटात झालेली कामे जलयुक्त शिवार अभियान आराखड्यात** दर्शविण्याबाबत.

**संदर्भ :-** १.शासन निर्णय क्रमांक जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७/५ डिसेंबर, २०१४
२. दि.२९.०४.२०१७ रोजी चर्चीले गेलेले मुद्दे.

**महोदय,**

राज्यात वारंवार उद्भविणाऱ्या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानूसार जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. गावनिहाय आराखड्यात पाण्याचा ताळेबंद करताना पुर्वीची झालेली सर्व कामे दशविणे अपेक्षित आहे. परंतु दि.२९.४.२०१७ रोजी विभागीय आयुक्त नाशिक कार्यालयात कृषि विभाग, वन विभाग व जलसंधारण विभाग यांच्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा केलीअसता, कृषी विभागामार्फत सन २००७ मध्ये गावनिहाय, तालुकानिहाय व जिल्हानिहाय यथार्थदर्शी आराखडा तयार करण्यात आलेला होता. त्यातील झालेली कामे व जलयुक्त शिवार अभियानात पाण्याच्या ताळेबंद तयार करताना पुर्वीची झालेली कामे प्रस्तावित करताना त्यात यथार्थदर्शी आराखड्यात झालेली कामे ही गाव निहाय आराखडा तयार करताना घेतल्याचे दिसून येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत नाशिक जिल्हयातील चांदवड तालुक्यातील मौजे- मेसनखेडे व सिन्नर तालुक्यातील मौजे- डुबेरे या दोन गावांचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त आराखडा यांची पडताळणी केली असता ..

१. मौजे मेसनखेडे, ता.चांदवड, जि.नाशिक या गावाचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा यांची आकडेवारी तपासली असता दगडीबांध (मोठे)- ३, मातीचे लहान बांध- ४०, गावतलाव ल.पा.(जि.प.)- २, गावतलाव ल.पा. (स्थानिकस्तर)- १ ही कामे यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली आहेत. परंतु जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करताना यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली कामे न घेतल्यामुळे पूर्वी झालेल्या कामांमुळे अडविण्यात आलेला पाणीसाठा कमी दिसत असून या तफावतीमुळे गावाचे वॉटर बजेट निश्चित चुकले आहे. त्यामुळे पाणी उपलब्धतेच्या परिगणनेत तफावत असल्याचे दिसून येते.

२. त्याचप्रमाणे मौजे डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक या गावाचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा याची आकडेवारी तपासली असता सलग समतल चर- २० हेक्टर, मातीचे लहान बांध-३१०, सिमेंट नाला बांध- ०१ ही कामे यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली आहेत. परंतु जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करताना यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली कामे न घेतल्यामुळे पुर्वी झालेल्या कामांमुळे अडविण्यात आलेला पाणीसाठा कमी दिसत असून या तफावतीमुळे गावातील वॉटर न्यूट्रिलीटीची टक्केवारी कमी झालेली आहे. त्यामुळे पाणी परिगणनेत तफावत असल्याचे दिसून येते. **(तक्ते सोबत जोडले आहेत)**

३. क्षेत्रीय स्तरावर कामांचीपहाणी केली असता किरकोळ स्वरूपाच्या दुरूस्ती अभावी जुन्या अस्तित्वात असलेल्या कामांची उदा. केटी बंधारे, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव, गाव तलाव, माती नाला बांध यांची उपयुक्तता कमी झालेली आहे. त्यामुळे उपयुक्त जलसाठा कमी झाल्याचे दिसून येते. सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या आराखड्यमध्ये अशा किरकोळ स्वरूपाच्या दुरूस्तीच्या कामांना प्रथम प्राधान्य देऊन ही कामे घेण्यात यावीत.

प्रस्तुत प्रकरणी आपणांस सुचित करण्यात येते की, वरील परिच्छेद एक व दोन नूसार गावांच्या पाण्याचा ताळेबंद हा प्रातिनिधीक स्वरूपात तपासला आहे. तद्‌नूसार इतरही गावांमध्ये अशी तफावत असण्याची शक्यता आहे. तरी यापुढे जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करताना प्रत्येक स्तरावर (गाव, तालुका, जिल्हा) उपरोक्त परिच्छेद एक ते तीन प्रमाणे सर्व बाबींची पूर्तता/पडताळणी करून सन २०१६-१७ चे जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तपासण्यात यावे व त्याची यथाथदर्शी आराखडा २००७ शी तुलना करून त्याप्रमाणे सुधारित करावेत. तसेच सन २०१७-१८ चे आराखडे तयार करताना यथार्थदर्शी आराखड्यानूसार पूर्ण झालेली अस्तित्वात असलेली सर्व कामे अंतर्भूत करूनच आराखडा तयार करण्यात यावा.

**(एकनाथ डवले)**
**सचिव जलसंधारण**

प्रत, सर्व विभागीय आयुक्त
**सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांना माहीती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.**
संचालक, मृदसंधारण व पाणलोट, पुणे

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१ / २२८४६९७४

Email:- jalseven.wc@gmail.com

narayan.karad@nic.in

क्रमांक :-जशिअ.-२०१७/प्र.क्र.२४७/जल-७

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : १६ मे, २०१७

**प्रति,**

**सर्व जिल्हाधिकारी,**

**विषय :- यथार्थदर्शी आराखड्यानूसार पाणलोटात झालेली कामे जलयुक्त शिवार अभियान आराखड्यात दर्शविण्याबाबत.**

**संदर्भ :- १.शासन निर्णय क्रमांक जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७/५ डिसेंबर, २०१४**

**२. दि.२९.०४.२०१७ रोजी चर्चीले गेलेले मुद्दे.**

**महोदय,**

राज्यात वारंवार उद्भविणाऱ्या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानूसार जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. गावनिहाय आराखड्यात पाण्याचा ताळेबंद करताना पुर्वीची झालेली सर्व कामे दशविणे अपेक्षित आहे. परंतु दि.२९.४.२०१७ रोजी विभागीय आयुक्त नाशिक कार्यालयात कृषि विभाग, वन विभाग व जलसंधारण विभाग यांच्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा केली असता, कृषी विभागामार्फत सन २००७ मध्ये गावनिहाय, तालुकानिहाय व जिल्हानिहाय यथार्थदर्शी आराखडा तयार करण्यात आलेला होता. त्यातील झालेली कामे व जलयुक्त शिवार अभियानात पाण्याच्या ताळेबंद तयार करताना पुर्वीची झालेली कामे प्रस्तावित करताना त्यात यथार्थदर्शी आराखड्यात झालेली कामे ही गाव निहाय आराखडा तयार करताना घेतल्याचे दिसून येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत नाशिक जिल्हयातील चांदवड तालुक्यातील मौजे- मेसनखेडे व सिन्नर तालुक्यातील मौजे- डुबेरे या दोन गावांचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त आराखडा यांची पडताळणी केली असता ..

१. मौजे मेसनखेडे, ता.चांदवड, जि.नाशिक या गावाचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा यांची आकडेवारी तपासली असता दगडीबांध (मोठे)- ३, मातीचे लहान बांध- ४०, गावतलाव ल.पा.(जि.प.)- २, गावतलाव ल.पा. (स्थानिकस्तर)- १ ही कामे यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली आहेत. परंतु जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करताना यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली कामे न घेतल्यामुळे पूर्वी झालेल्या कामांमुळे अडविण्यात आलेला पाणीसाठा कमी दिसत असून या तफावतीमुळे गावाचे वॉटर बजेट निश्चित चुकले आहे. त्यामुळे पाणी उपलब्धतेच्या परिगणनेत तफावत असल्याचे दिसून येते.

२. त्याचप्रमाणे मौजे डुबेरे, ता.सिन्नर, जि.नाशिक या गावाचा यथार्थदर्शी आराखडा व जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा याची आकडेवारी तपासली असता सलग समतल चर- २० हेक्टर, मातीचे लहान बांध-३१०, सिमेंट नाला बांध- ०१ ही कामे यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली आहेत. परंतु जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करताना यथार्थदर्शी आराखड्याप्रमाणे पूर्ण झालेली कामे न घेतल्यामुळे पुर्वी झालेल्या कामांमुळे अडविण्यात आलेला पाणीसाठा कमी दिसत असून या तफावतीमुळे गावातील वॉटर न्यूट्रिलीटीची टक्केवारी कमी झालेली आहे. त्यामुळे पाणी परिगणनेत तफावत असल्याचे दिसून येते. **(तक्ते सोबत जोडले आहेत)**

३. क्षेत्रीय स्तरावर कामांची पहाणी केली असता किरकोळ स्वरूपाच्या दुरुस्ती अभावी जुन्या अस्तित्वात असलेल्या कामांची उदा. केटी बंधारे, सिमेंट नाला बांध, पाझर तलाव, गाव तलाव, माती नाला बांध यांची उपयुक्तता कमी झालेली आहे. त्यामुळे उपयुक्त जलसाठा कमी झाल्याचे दिसून येते. सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या आराखड्यामध्ये अशा किरकोळ स्वरूपाच्य दुरुस्तीच्या कामांना प्रथम प्राधान्य देऊन ही कामे घेण्यात यावीत.

प्रस्तुत प्रकरणी आपणांस सुचित करण्यात येते की, वरील परिच्छेद एक व दोन नूसार गावांचे पाण्याचा ताळेबंद हा प्रातिनिधीक स्वरूपात तपासला आहे. तदनूसार इतरही गावांमध्ये अशी तफावत असण्याची शक्यता आहे. तरी यापुढे जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तयार करताना प्रत्येक स्तरावर (गाव, तालुका, जिल्हा) उपरोक्त परिच्छेद एक ते तीन प्रमाणे सर्व बाबींची पूर्तता/पडताळणी करून सन २०१६-१७ चे जलयुक्त शिवार अभियानाचे आराखडे तपासण्यात यावे व त्याची यथाथदर्शी आराखडा २००७ शी तुलना करून त्याप्रमाणे सुधारित करावेत. तसेच सन २०१७-१८ चे आराखडे तयार करताना यथार्थदर्शी आराखड्यानूसार पूर्ण झालेली अस्तित्वात असलेली सर्व कामे अंतर्भूत करूनच आराखडा तयार करण्यात यावा.

mail send
२०/५/१६ (2.25 pm)

(एकनाथ डवले)
सचिव जलसंधारण

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
३. सर्वजिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.

यांना माहीती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

ISSUED
Date 26/5/16

## यशार्थदर्शी आराखडयाप्रमाणे प्रस्तावित / झालेली व शिल्लक कामे व जलयुक्त शिवार अभियानात पुर्वीची झालेली कामे याचां तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | गावांचे नांव /तालुका | यंत्रणेचे नांव | कामाचा प्रकार | यथार्थदर्शी आराखडयाप्रमाणे कार्यक्रम | | | | | | जलयुक्त शिवार आराखडयात | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रस्तावित कामे | | झालेली कामे मार्च २००७ अखेर | | शिल्लक कामे | | आराखडयात दर्शविण्यात आलेली पुर्वीची झालेली कामे | | प्रस्तावित केलेली कामे | | |
| | | | | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | मेसनखेडे ता.चांदवड | कृषि विभाग | जैविक बांध | 0 | 0.00 | 0 | 0 | 0 | 0 | | | | | |
| | | | समतल सलग चर | | 30.00 | | | 0 | 30.00 | | | | 80 | |
| | | | मजगी | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध (लहान) | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध (मोठे) | | 15.00 | | 3.00 | 0 | 12.00 | | | | | |
| | | | शेततळे | 3 | | | | 3 | 0 | 18 | | 12 | | |
| | | | वळण बंधारा | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | सिमेंट नालाबांध | 2 | | | | 2 | 0 | 2 | | 2 | | |
| | | | मातीनाबांध | 6 | | 2 | | 4 | 0 | 7 | | 5 | | |
| | | | मातीबांध (लमाब) | 100 | | 40 | | 60 | 0 | | | | | |
| | | | गाळरोधक भिंत | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | कंटूर बंडींग | | 100.00 | | | 0 | 100.00 | | | | | |
| | | | कंपार्टमेंट बंडींग | | 0.00 | | | 0 | 0 | | | | 299 | |
| | | | वृक्ष लागवड | | 150.00 | | | 0 | 150.00 | | | | | |
| | | | गाळ काढणे | | | | | | | | | 2 | | |
| | | | विहीर पुनर्भरण | | | | | | | | | 24 | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | 111 | 295.00 | 42 | 3.00 | 69 | 292.00 | 27 | 0.00 | 19 | 379 | 0.00 |
| २ | | सामाजिक वनिकरण | वृक्षलागवड | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | वनीकरण | | 10 | | | 0 | 10.00 | | | | | |
| | | एकूण | | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ३ | | वन विभाग | सि.ना.बांध | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | सी.सी.टी/वनीकरण | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | वनतळे | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ४ | | लघु पाटबंधारे विभाग ( जिल्हा परिषद ) | सिमेंट प्लॅग | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | गांव तलाव | 4 | | 2 | | 2 | 0 | | | | | |
| | | | पाझर तलाव | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 4 | 0 | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ५ | | जी.एस.डी.ए. | जलभंजण | | | | | 0 | 0 | | | 8 | | |
| | | | जॅकेटवेल | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | एफएससी | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 |
| | | स्थानिक स्वराज संस्था | | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | |
| | | ग्रामपंचायत | | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | |
| ६ | | लघु पाटबंधारे विभाग | गावतळे | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | गावतलाव | 1 | | 1 | | 0 | 0 | | | | | |
| | | | पाझरतलाव | | | | | | | 1 | | | | |
| | | | सिमेंट नालाबांध | | | | | | | | | 1 | | |
| | | (स्थानिकस्तर) एकूण | | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 |
| एकूण पाणलोट | | | | 116 | 305.00 | 45 | 3.00 | 71 | 302.00 | 28 | 0 | 28 | 379 | 0 |

## यथार्थदर्शी आराखडयाप्रमाणे प्रस्तावित / झालेली व शिल्लक कामे व जलयुक्त शिवार अभियानात पुर्वीची झालेली कामे याचां तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | गावांचे नांव /तालुका | यंत्रणेचे नांव | कामाचा प्रकार | यथार्थदर्शी आराखडयाप्रमाणे कार्यक्रम | | | | | | जलयुक्त शिवार आराखडयात | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रस्तावित कामे | | झालेली कामे मार्च २००७ अखेर | | शिल्लक कामे | | आराखडयात दर्शविण्यात आलेली पुर्वीची झालेली कामे | | प्रस्तावित केलेली कामे | | |
| | | | | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | कामे संख्या | क्षेत्र | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | डुबेरे ता.सिन्नर | कृषि विभाग | जैविक बांध | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | समतल सलग चर | | 30.00 | | 20.00 | 0 | 10.00 | | | | | |
| | | | मजगी | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध (लहान) | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध (मोठे) | | | | | 0 | 0.00 | | | | | |
| | | | शेततळे | | | | | 0 | 0 | 2 | | | | |
| | | | वळण बंधारा | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | सिमेंट नालाबांध | 4 | | 3 | | 1 | 0 | 2 | | | | |
| | | | मातीनाबांध | 8 | | 2 | | 6 | 0 | 2 | | | | |
| | | | मातीबांध (लमाब) | 310 | | 310 | | 0 | 0 | | | | | |
| | | | कंटूर बंडींग | | | | | 0 | 0.00 | | | | | |
| | | | कंपार्टमेंट बंडींग | | | | | 0 | 0 | | 304.5 | | | |
| | | | वृक्ष लागवड | | | | | 0 | 0.00 | | | | | |
| | | | गाळ काढणे | | | | | | | | | | | |
| | | | विहीर पुनर्भरण | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | 322 | 30 | 315 | 20 | 7 | 10 | 6 | 304.5 | 0 | 0 | |
| २ | | सामाजिक वनिकरण | वृक्षलागवड | 0 | 70.00 | | | 0 | 70 | | | | | |
| | | | वनीकरण | | | | | 0 | 0.00 | | | | | |
| | | एकूण | | 0 | 70 | 0 | 0 | 0 | 70 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ३ | | वन विभाग | सि.ना.बांध | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | सी.सी.टी/वनीकरण | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | दगडीबांध | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ४ | | लघु पाटबंधारे विभाग ( जिल्हा परिषद ) | सिमेंट प्लॅग | 6 | | | | 6 | 0 | 4 | | | | |
| | | | गांव तलाव | 2 | | | | 2 | 0 | 2 | | | | |
| | | | पाझर तलाव | 0 | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 8 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 |
| ५ | | जी.एस.डी.ए. | जलभंजण | 1 | | | | 1 | 0 | | | | | |
| | | | जॅकेटवेल | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | एफएससी | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | एकूण | | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| ६ | | लघु पाटबंधारे विभाग | गावतळे | | | | | 0 | 0 | | | | | |
| | | | गावतलाव | | | | | 0 | 0 | 1 | | | | |
| | | | पाझरतलाव | | | | | | | 1 | | | | |
| | | | सिमेंट नालाबांध | | | | | | | | | | | |
| | | (स्थानिकस्तर) एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | |
| एकूण पाणलोट | | | | 331 | 100 | 315 | 20 | 16 | 80 | 14 | 304.5 | 0 | 0 | |